(माधव आर्ट प्रिंटर्स, तासगांव)

# दि तासगांव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., तासगांव

प्रधान कार्यालय : तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली फोन नं. (०२३४६) २४१२९०, २४१२९१

## लॉकर संबंधीचे नियम

| अ.क्र. | नियम |
|---|---|
| १ | सामान्यत: बँकेचे सभासद व खातेदार यांना लॉकर्स भाड्याने देण्यात येतील त्यावेळी त्यास सभासद नसल्यास नाममात्र सभासद व्हावे लागेल. कोणासही कोणतेही कारण न देता लॉकर नाकारण्याचा बँकेस अधिकार आहे. |
| २ | बँक व लॉकरधारक यांचे संबंध बँक व खातेदार असे न राहता मालक व भाडेकरु असे राहतील. |
| ३ | लॉकर निरनिराळ्या आकाराचे आहेत. त्याचे भाडे ठरविण्याचा अगर ते कमी-जास्त करण्याचा अधिकार बँकेस राहील. लॉकर चे भाडे आगाऊ भरले पाहिजे. लॉकर भाड्याने देण्याची मुदत सहामाही व वार्षिक अशी राहील व पुढे वाढवण्याची मुदत त्याप्रमाणात वाढवली जाईल. तुट मुदतीचा करार आवश्यकता असल्यास करता येईल. |
| ४ | लॉकर धारकास कोणासही लॉकर पोटभाड्याने देता येणार नाही. |
| ५ | लॉकरमध्ये स्फोटके व आरोग्य विघातक किंवा कोणत्याही प्रकारे धोका निर्माण करणारे जिन्नस ठेवता येणार नाहीत. असे जिन्नस लॉकरमध्ये ठेवल्यास किंवा ठेवण्याचा हेतू असल्याचे बँकेचे निदर्शनास आल्यास बँक लॉकर भाड्याने देण्यास कोणतेही कारण न देता नाकारु शकेल किंवा अगोदर लॉकर भाड्याने दिला असेल तर तातडीने तो मोकळा करुन घेऊ शकेल. |
| ६ | भाड्याने दिलेल्या प्रत्येक लॉकरचा नंबर किल्लीचा नंबर व भाडेकऱ्याने दिलेला सांकेतिक शब्द हे गुप्त ठेवण्यात येतील. भाडेकऱ्याकडून वरीलपैकी कोणत्याही गोष्टीचा परिस्फोट झाल्यास वा त्यामुळे भाडे कराराचे नुकसान झाल्यास त्याचे उत्तरदायित्व बँकेकडे न राहता भाडेकऱ्यावरच राहील. लॉकरची किल्ली हरवल्यास, गहाळ झाल्यास व दुसऱ्या कोणाच्या हाती पडल्यास खातेदाराने ताबडतोब बँकेस लेखी कळविले पाहिजे. किल्ली गहाळ झाल्यास लॉकर फोडण्याचा सर्व खर्च खातेदारास सोसावा लागेल. त्याची रक्कम त्यावेळी बँकेकडे आगावू भरली पाहिजे. तसेच त्यास बँकेमध्ये बँक नियमानुसार ठेव रक्कम आगावू भरली पाहिजे. आगावू रक्कम न भरलेस लॉकरसाठी येणारा सदर खर्च ठेव रक्कमेतून वजा केला जाईल. याची खातेदाराने नोंद घ्यावी. लॉकर व त्याची किल्ली कुलूप यांची दुरुस्ती जेव्हा आवश्यक असेल तर बँकेने नेमलेल्या कारागिराकडूनच फक्त केली जाईल. |
| ७ | भाडेकऱ्याच्या कोणत्याही कृत्यामुळे लॉकरचे अगर लॉकर असलेल्या इमारतीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई भाडेकऱ्याने करण्याची आहे. |
| ८ | लॉकर धारकास शाखा व्यवस्थापकांनी सांगितल्यानुसार छोट्या लॉकरसाठी रु. ५०००/-, मध्यम लॉकरसाठी रु. ८०००/-, मोठ्या लॉकरसाठी रु. ११,०००/- ठेव डिपॉझिट म्हणून बँकेमध्ये ठेवावी लागेल. सदर ठेवीवर कर्ज मिळणार नाही. मात्र सदर ठेवीस व्याज बँकेच्या प्रचलित दरानुसार दिले जाईल. लॉकरची मुदत संपताच ३ महिन्यात लॉकर भाडे भरुन लॉकरचे नुतनीकरण न केल्यास बँक नोटीस पाठवून लॉकर मोकळा करुन घेईल व होणारा खर्च लॉकरसाठी ठेवलेल्या ठेवीतून वसूल केला जाईल. त्यामध्ये होणाऱ्या नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही. तसेच नोटीस पत्ता सापडत नाही किंवा अन्य कारणाने परत आली तरी नोटीस पोहोचली असे समजले जाईल. |
| ९ | नियमाविरुद्ध वर्तन करणाऱ्या भाडेकरुचे लॉकर वापरण्याचा हक्क रद्द करण्याचा व त्यांच्या विरुद्ध कायदेशीर उपाययोजना करण्याचा बँकेस अधिकार राहील. लॉकर भाड्याने घेण्याचा करार भाडेकरुने स्वत:च केला पाहिजे. भाडेकरुचे वतीने तो दुसऱ्या इसमास करता येणार नाही. रजिस्टर संस्थांचे बाबतीत लॉकर भाड्याने घेण्याचा व्यवहार संस्थेने त्यासाठी मुद्दाम अधिकृत केलेल्या इसमासच करता येईल. अशा अधिकृत इसमाचा सदर अधिकार काढून तो संस्थेने दुसऱ्यास दिल्यास व तशी लेखी सूचना बँकेकडे ताबडतोब न दिल्यास व त्यामुळे संस्थेचे काही नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी त्या संस्थेवर राहील. बँकेवर असणार नाही. |
| १० | बँकेकडे नमूद असलेल्या पत्त्यावर लेखी नोटीस पोष्टाने अगर अन्य मार्गाने पाठविली असता ती भाडेकरुवर अगर त्याचे अधिकृत वाली वारसावर योग्य प्रकारे लागू झाली असे समजण्यात येईल. |
| ११ | भाडेकरुने लॉकर उघडणेचे वेळी अन्य लॉकर्सच्या भाडेकरुंना विलंब होईल अशा पद्धतीने वर्तन करु नये. |

| अ.क्र. | नियम |
|---|---|
| १२ | भाडेकरुने लॉकर उघडून बाहेर जाताना त्यांनी आपला लॉकर बंद करुन घेतला आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. स्वत: भाडेकरुचे हातून त्याचा लॉकर उघडा राहिल्यास त्याचे होणारे नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही. |
| १३ | लॉकरधारकांनी दरवर्षी किमान ५ वेळा लॉकर उघडला पाहिजे. |
| १४ | दर ३ वर्षानंतर एकदा लॉकर धारकांने सदर लॉकरचे नुतनीकरण केले पाहिजे. |
| १५ | लॉकर धारकांने सलग ३ वर्षे लॉकर घडला नाही तर त्यास लॉकरची गरज नाही असे गृहीत धरुन लॉकर रद्द केला जाईल. रद्द करण्याची नोटीस पाठविल्यावर ७ दिवसात लॉकर रिकामा करुन लॉकरची किल्ली बँकेकडे जमा करावी. |
| १६ | लॉकरसाठी घेण्यात येणाऱ्या डिपॉझीटला प्रचलित दरानुसार व्याज दिले जाईल. मात्र सदर लॉकर नादुरुस्त झाल्यास येणारा खर्च डिपॉझीट मधून कापून घेण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. |
| १७ | लॉकर घेताना लॉकर बद्दलचे संपूर्ण नियम भाडेकरुने वाचले आहेत व ते सर्व त्यास मान्य आहेत असे गृहीत धरले जाईल व नियम त्यांचेवर बंधनकारक राहतील. |
| १८ | लॉकरमध्ये ठेवण्यात येणाऱ्या सर्व चीज वस्तू व इतर कागदपत्रे हे मी माझ्या स्वत:च्या जबाबदारीवर ठेवत असून त्यात असलेल्या वस्तूंची बँकेस कल्पना नाही. त्यातील काही चीजवस्तू गहाळ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझेवर / आमचेवर राहील. यास मी / आम्ही बँकेस जबाबदार धरणार नाही. |
| १९ | आगाऊ सूचना न देता लॉकर्स बद्दलचे नियमात फेरफार करण्याचा अगर असलेले नियम रद्द करुन नवीन नियम करण्याचा बँकेस पूर्ण अधिकार राहील. सदर फेरफार अगर नियम भाडेकरुवर बंधनकारक राहतील. |

बँकेने केलेले वरील नियम मला मान्य असून ते मी कसोशीने व प्रामाणिकपणे पाळीन.

स्थळ :

दिनांक :

अर्जदार लॉकर धारकाची सही